आकाशवाणी, पुणे
राष्ट्रीय बातमीपत्र
रात्री 9 वाजून 15 मि.

दिनांक – 31.07.2021 वार – शनिवार

---

आधी एक विनंती,
18 वर्षांवरील सर्वांसाठी कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरू झाली आहे. सर्वांनी लसीकरण करून घ्या. पण नंतरही काळजी घ्या. मुखपट्टी वापरा, सुरक्षित अंतर राखा, हात, चेहरा वारंवार स्वच्छ धुवा. विनाकारण घराबाहेर पडून गावात गर्दी करू नका. कोविड-19 बद्दल काही प्रश्न असतील तर 011-23 978 046 आणि 1075 या राष्ट्रीय; तसंच 020-26 127 394 या महाराष्ट्रासाठीच्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधा.

---

**ठळक बातम्या**

1.शाश्वत विकासाचं काम नवे पोलिस अधिकारी पुढे नेतील असा पंतप्रधानांचा विश्वास,
2.भारताच्या सेवा क्षेत्रातील निर्यातीमध्ये मोठी वाढ
3.अटल टिंकर प्रिन्युअर कार्यशाळेत नऊ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचा विक्रमी सहभाग
4.टोकियो ऑलिंपिक्समध्ये आजच्या दिवशी भारतीय खेळाडूंना संमिश्र यश आणि
5.पावसाळ्याच्या पूर्वार्धात राज्यात सरासरीपेक्षा 24 टक्के जास्त पावसाची नोंद

**मोदी आयपीएस प्रशिक्षणार्थी**

माओवाद्यांचा हिसांचार आपण कठोर मेहनतीनं आटोक्यात आणत असून आदिवासी भागांमध्ये आपण विकास आणि विश्वासाचे नवे पुल बांधले असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी इथं आयपीएस प्रशिक्षणार्थीसोबत संवाद साधताना ते बोलत होते. आपल्यासारखं युवा नेतृत्व हे काम पुढे नेईल अशी खात्री असल्याचं मोदी यांनी सांगितलं. पोलिसांनी तंदुरूस्तीचा प्रचार-प्रसार केला तर समाजातील युवकांना देखील तंदुरूस्त राहण्यासाठी आणखी प्रोत्साहन मिळेल अशी सूचना त्यांनी केली. कामातील कौशल्यं आणि तंदुरूस्ती या आपल्या पोलिस दलाच्या दोन सर्वात महत्वाच्या गरजा असल्याचं सांगून पंतप्रधानांनी आपल्यासारखे युवा पोलिस अधिकारी पोलिस यंत्रणेमध्ये अशा प्रकारच्या सुधारणा लागू करु शकतात असा विश्वास व्यक्त केला. गेल्या 75 वर्षांमध्ये, भारतानं एक उत्तम पोलिस सेवा उभारण्याचा प्रयत्न केला आहे, पोलिस प्रशिक्षणाशी निगडीत

पायाभूत सुविधा देखील अलिकडील वर्षांमध्ये खूप सुधारल्या असल्याचं मोदी म्हणाले.यामध्ये सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना पंतप्रधानांनी विविध प्रश्न विचारले त्यावर या अधिकाऱ्यांनी आपले विचार मांडले या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय हे देखील उपस्थित होते. हैदराबादची सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी ही देशातली प्रमुख पोलीस प्रशिक्षण संस्था आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधून भारतीय पोलीस सेवेसाठी निवड झालेल्या अधिकाऱ्यांना इथे प्रशिक्षण दिलं जातं.

**पियूष गोयल**

भारताच्या सेवा निर्यातीत सध्या मोठी वाढ दिसून येत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज केलं. गेल्या 20 वर्षांच्या कालावधीत सेवा निर्यातीत12 पटींनी वाढ झाल्याचं ते म्हणाले. दुसऱ्या भारत-अमेरिका सेवा परिषदेला संबोधित करताना गोयल म्हणाले की 2001 साली भारताकडून जगभरात होत असलेली निर्यात 17 बिलियन डॉलर इतकी होती, जी 2020-21 साली 205 बिलियन अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचली आहे. भारताच्या सेवाक्षेत्रातली कौशल्यं, स्टार्टअप्स आणि सॉफ्टवेअर उपाय यामुळे रोजगारनिर्मिती आणि व्यवसायाच्या संधी वाढतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**अटल टिंकरप्रिन्युअर**

अटल नवनिर्मिती अभियानाने दोन महिन्यांचा अटल टिंकरप्रिन्युअर बूटकँप यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांसाठीच्या या उपक्रमात 32 राज्यं आणि 298 जिल्ह्यांमधले 9 हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. यात 4 हजारापेक्षा जास्त मुलींचाही सहभाग होता. विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मितीक्षम विचार रुजवणं आणि त्यांची कल्पना कमी वेळात प्रत्यक्षात उतरवण्यासाठी अपयश आलं तरी सातत्याने प्रयत्न करत राहण्यासाठी त्यांना मदत करणं हा या बूटकँपचा उद्देश असल्याचं नीती आयोग आणि अटल नवनिर्मिती अभियानाचे संचालक डॉक्टर चिंतन वैष्णव यांनी सांगितलं.

**केंद्र कोरोना आढावा**

सध्या देशातल्या ज्या राज्यांमध्ये कोरोनाबाधितांच्या संख्येत आणि रुग्ण आढळून येण्याच्या प्रमाणात वाढ होत आहे त्या १० राज्यांमधल्या कोरोनाच्या परिस्थितीचा आढावा आज केंद्र सरकारने घेतला. ज्या भागांमध्ये कोरोनाचे जास्त रुग्ण आढळून येत आहेत तिथे प्रसार रोखण्यासाठी कडक पावलं उचलण्याच्या आणि सक्रीय निगराणी करण्याच्या सूचना यावेळी राज्यांना देण्यात आल्या. केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी केरळ, महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू, ओडिशा, आसाम, मिझोराम, मेघालय, आंध्रप्रदेश आणि मणीपूर या १० राज्यांमधल्या कोरोना परिस्थितीचा आढावा

घेतला. ज्या जिल्ह्यांमध्ये कोरोनाचे रुग्ण आढळून येण्याचा दर 10 टक्क्यांपेक्षा जास्त आहे तिथे गर्दी टाळण्यासाठी कडक निर्बंध लागू करण्याच्या सूचना त्यांनी राज्यांना दिल्या.

**देश-कोविड**

देशात आज सकाळी संपलेल्या चोवीस तासात 41 हजार 649 नवीन कोरोनाबाधितांची नोंद झाली. तर 37 हजार 291 रुग्ण कोरोनामुक्त झाले. या कालावधीत कोविड-19 मुळे 593 मृत्युंची नोंद झाली. देशात सध्या 4 लाख 8 हजारांहून अधिक कोरोना रुग्ण उपचार घेत आहेत. त्यांचं प्रमाण 1 पूर्णांक 28 शतांश टक्के आहे. तर बरे झालेल्या कोरोना रुग्णांचं प्रमाण 97 पूर्णांक 38 शतांश टक्के आहे. कोविड-19 मुळे देशात आजवर दगावलेल्यांची संख्या 4 लाख 23 हजारांहून अधिक झाली आहे. कोविड प्रतिबंधात्मक लसींच्या 46 कोटी 15 लाखांहून अधिक मात्रा आजवर देशभरात देऊन झाल्या आहेत. काल दिवसभरात सुमारे 53 लाख लसींच्या मात्रा देण्यात आल्या. लसीकरणात उत्तरप्रदेश प्रदेश प्रथम, महाराष्ट्र दुसऱ्या तर गुजरात तिसऱ्या स्थानावर कायम आहेत.

NEW  DAY INDIA-OLYMPICS

**इंट्रो-**

टोकियो ऑलिंपिक्समध्ये आजच्या दिवशी भारतीय खेळाडूंना संमिश्र यश मिळालं. दिवसभरातल्या भारतीय खेळाडूंच्या कामगिरीवर ऐकूया हा वृत्तांत...

**स्क्रिप्ट-**

**बॅडमिंटनपटू पी. वी. सिंधू महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत चिनी तैपैच्या ताई झु यिंग हिच्याकडून पराभूत झाली. 21-18, 21-12 अशा दोन गेम्समध्ये ताई झु यिंग हिनं विजय संपादन केला. आता कांस्य पदकासाठी सिंधूची लढत उद्या चीनच्या हे बिंग जिआओ हिच्यासोबत पडणार आहे.**

**महिलांच्या हॉकी संघानं अ गटातील विजयासाठी अत्यावश्यक सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा 4 विरुद्ध 3 गोल्सनं पराभव केला. वंदना कटारियाच्या ऐतिहासिक हॅटट्रीकच्या बळावर भारतीय संघाला उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करण्याची संधी वाढली आहे. थाळी फेक पटू कमलप्रीत कौरनं पात्रता फेरीत 65 मीटर अंतरावर थाळी फेकून महिलांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. ही फेरी 2 ऑगस्ट रोजी होईल. राष्ट्रीय विक्रमवीर कमलप्रीत एकूण गुणांकांमध्ये दुसरी आली. पण थाळीफेक पटू सीमा पुनिया 60 पूर्णांक 57 मीटर अंतरापर्यंतच थाळी फेकू शकल्यानं 16 व्या स्थानावर राहिली. महिलांच्या 50 मीटर रायफल थ्री पोझिशन्समध्ये अंजुम मौदगिल आणि तेजस्विनी सावंत पात्रता फेरीत अनुक्रमे पंधरा आणि तेहतिसाव्या स्थानावर राहिल्यानं अंतिम फेरीत पोहोचू शकल्या नाहीत. भारतीय मुष्टियोद्धा पूजा रानी उपांत्यपूर्व फेरीत मिडलवेट म्हणजे 75 किलोग्रॅम श्रेणीत चीनच्या कियान ली हिच्याकडून 0-5 अशा गुणांनी पराभूत झाली. अमित पंघल देखील पुरुषांच्या फ्लायवेट प्रकारात पराभूत झाला. तीरंदाजीमध्ये अतनु दास उप-उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरु शकला नाही त्यामुळं भारताचं तीरदांजीतील आव्हान आता संपुष्टात आलं आहे. पुरुषांच्या लांब उडीच्या पात्रता फेरीत भारताचा श्रीशंकर तेराव्या स्थानावर राहिला. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

आताच हाती आलेल्या वृत्तानुसार, महिला हॉकीच्या अ गटामधील अंतिम सामन्यात ग्रेट ब्रिटननं आयर्लंडचा 2-0 असा पराभव केल्यामुळं भारतीय महिला हॉकी संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला आहे. आता त्यांची गाठ ऑस्ट्रेलियासोबत पडणार आहे.

**मिझोराम आसाम**

मिझोरामच्या कोलासिब जिल्ह्यातल्या एका पोलीस स्थानकात आसामचे मुख्यमंत्री हेमंत विश्व शर्मा आणि आसाम सरकारच्या 6 अधिकाऱ्यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मिझोराम आणि आसामच्या पोलीस दलांमध्ये 26 जुलै रोजी झालेल्या हिंसक झटापटीनंतर ही तक्रार दाखल करण्यात आली आहे. या झटापटीत 5 जणांचा मृत्यू झाला होता तर अनेकजण जखमी झाले होते. या तक्रारीत राज्य पोलीस दलाच्या कर्मचाऱ्यांना धमकी देणं, सुरक्षा चौक्यांवर हल्ला करणं, वन्यक्षेत्रावर अतिक्रमण करणं आणि वैरेंगते इथे गोळीबार करणं असे आरोप लावण्यात आले आहेत.

**झारखंड न्यायाधीश**

झारखंडच्या धनबादचे अतिरिक्त आणि जिल्हा सत्र न्यायाधीश उत्तम आनंद यांच्या मृत्यूचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाला 3 ऑगस्टपर्यंत त्यांचा अहवाल सादर करण्याचे आदेश झारखंड उच्च न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणाचा तपास वेगाने आणि व्यवस्थितरित्या व्हावा असंही न्यायालयाने म्हटलं आहे. तसंच जानेवारी 2020 नंतर राज्यात वाढत्या गुन्हेगारीची माहितीही न्यायालयाला देण्याचे आदेश झारखंडच्या पोलीस आयुक्तांना देण्यात आले.

**जम्मू-काश्मीर आयईडी**

जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशात सुरक्षादलांनी जम्मू-राजौरी-पूंछ राष्ट्रीय महामार्गाच्या जवळच एक आयईडी स्फोटक निकामी केलं. राजौरी पोलिसांना या भागात संशयास्पद हालचाली दिसून आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. सदर स्फोटक सापडल्यानंतर तीन तास हा महामार्ग बंद ठेवण्यात आला होता अशी माहिती आकाशवाणीच्या जम्मूच्या वार्ताहराने दिली आहे.

**पावसाची सरासरी**

इंट्रो-

पावसाळ्याच्या पूर्वार्धात राज्यात सरासरीपेक्षा 24 टक्के जास्त पाऊस झाला आहे. निम्मा पावसाळा काल संपला. या कालावधीतील पर्जन्यमानावर हा सविस्तर वृत्तांत...

स्क्रिप्ट-

या दोन महिन्यात राज्यात सरासरी 538 पूर्णांक 5 दशांश मिलिमिटर पाऊस पडतो. यंदा 669 पुर्णांक 9 दशांश मिलिमिटर पाऊस झाला असल्याची नोंद भारतीय हवामान शास्त्र विभागानं काल प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीत आहे. विभागनिहाय विचार करता कोकणात सर्वाधिक पाऊस झाला. कोकणात पावसाळ्याच्या पहिल्या 2 महिन्यात सरासरी 1 हजार 757 पुर्णांक 8 दशांश मिलिमिटर पाऊस अपेक्षित असतो. प्रत्यक्षात 37 टक्के जास्त, 2 हजार 402 पुर्णांक 7 मिलिमिटर पाऊस झाला आहे. मध्य महाराष्ट्रात या काळात पावसाची सरासरी 372 पुर्णांक 8 मिलिमिटर इतकी असते यंदा 500 पुर्णांक 4 मिलिमिटर म्हणजे सरासरी पेक्षा 26 टक्के जास्त पाऊस झाला आहे. मराठवाड्यात पावसाळ्याच्या पूर्वार्धातला पाऊस सरासरी पेक्षा 34 टक्के जास्त आहे. जून-जुलै मध्ये मराठवाड्यात सरासरी 317 पुर्णांक 1 दशांश मिलिमिटर पाऊस पडतो. कालपर्यंत 423 पुर्णांक 7 मिलिमिटर पाऊस झाला आहे. पावसाळ्याच्या पहिल्या 2 महिन्यातलं विदर्भातलं पाऊसमान तुलनेत कमी असलं तरी तिथेही सरासरीपेक्षा 4 टक्के जास्त पाऊस झाला आहे. जिल्हा निहाय विचार करता मुंबई उपनगर, रत्नागिरी, सातारा, जालना आणि परभणी या 5 जिल्ह्यात अतिजास्त म्हणता येईल असा सरासरीपेक्षा 60 टक्क्यांहून अधिक पाऊस झाला. मुंबई शहर, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर,सांगली,सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, वाशिम आणि चंद्रपूर जिल्ह्यातला पाऊसही सरासरीपेक्षा 20 ते 60 टक्के जास्त आहे. पालघर, नाशिक, हिंगोली, यवतमाळ , वर्धा, नागपूर, आणि भंडारा जिल्ह्यात सरासरीपेक्षा 20 टक्क्यांपर्यंत जास्त तर धुळे, जळगाव, बुलडाणा, अकोला,अमरावती, गोंदिया आणि गडचिरोलीत सरासरी पेक्षा 20 टक्क्यांपर्यंत कमी पाऊस झाला आहे. राज्यातला नंदुरबार हा एकमेव जिल्हा सध्या अवर्षणाच्या छायेत असून राज्याच्या उत्तर सीमेवरील दुर्गम भाग असलेल्या या आदिवासी जिल्ह्यातलं पावसाळ्याच्या पूर्वार्धातलं पाऊसमान सरासरीपेक्षा 43 टक्के कमी आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, नीतीन केळकर यांच्यासह, मनोज क्षीरसागर, पुणे.

**हिमाचल प्रदेश पूर**

हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे पूर परिस्थिती आणि दरडी कोसळून ओढवलेल्या आपत्तीच्या काळात सीमा रस्ते संघटनेकडून मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.वेगवेगळ्या ठिकाणी दरडी कोसळून इथल्या लाहौल आणि स्पिती खोऱ्यांमध्ये महत्त्वाचा असलेला मनाली-सरचू रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला होता. हा रस्ता मोकळा करण्यासाठी आणि मदत आणि बचावकार्यासाठी सीमा रस्ते संघटनेकडून प्रशिक्षित अभियंत्यांचं कृती दल पाठवण्यात आलं. याठिकाणी अडकून पडलेल्या अनेक नागरिकांना बाहेर काढण्यात या कृती दलाला यश आलं आहे.

**केरळ किनारा बंदी**

केरळमधल्या किनारपट्टीच्या प्रदेशात मासेमारी करण्यावर असलेली वार्षिक बंदी आज रात्री संपणार आहे. या 52 दिवसांच्या बंदीच्या काळात ३ हजारापेक्षा जास्त मासेमारांना समुद्रात जाता आलेलं नाही. त्यामुळे ते पुन्हा कामाला लागण्याच्या तयारीत आहेत तर त्याचवेळी राज्यात कोरोनाच्या प्रादुर्भावात सातत्याने वाढ होत असल्यामुळे त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागण्याचीही शक्यता आहे. ही बंदी 1988 सालापासून वाढत्या मासेमारीमुळे तिथल्या समुद्री जीवसृष्टीवर होणारे

परिणाम कमी करण्यासाठी लागू करण्यात येते. हाच ऋतू हा माशांच्या प्रजननाचा असल्यामुळे समुद्री संसाधनांमध्ये संतुलन साधलं जातं.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**